# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**सूचना** दि. १६.०१.२०२१

महाविद्यालयातील कर्मचारी कल्याण निधी समितीची बैठक दि. १३.०१.२०२१ रोजी संपन्न झाली तसेच ठराविक वेतनावरील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बैठक दि. १५.०१.२०२१ रोजी संपन्न झाली या दोन्ही बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

**अ) कर्मचारी कल्याण निधी बाबत :** – जानेवारी 2021 पासून अंमलबजावणी

१. ठराविक वेतनावरील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दोन वर्ष सलग सेवा पूर्ण झाल्यानंतर कर्मचारी कल्याण निधीचे सदस्यत्व देणे.

२. जानेवारी २०२१ च्या वेतनापासून कर्मचारी कल्याण निधीची वर्गणी दरमहा रु. १००/- कपात होईल.

३. कर्जमर्यादा अनुदानित कर्मचारी रु. ७५०००/- ठराविक वेतनावरील शिक्षक रु.५०,०००/- ठराविक वेतनावरील शिक्षकेत्तर कर्मचारी रु.२०,०००/- अशी राहील.

४. या कर्जास ०४ टक्के व्याज असून वसूली एकूण २४ हप्त्यामध्ये होईल.

५. मुदतीपूर्वी रोखीने कर्ज चुकते केले तरीही अगोदर उचललेल्या कर्जाच्या कालावधीपासून २४ महिन्यानंतरच दुसरे कर्ज अदा केले जाईल.

६. मर्यादित निधी शिल्लक असल्यानंतर कर्जमागणीसाठी अनेक अर्ज आले तर यापूर्वी ज्यांनी एकदाही कर्ज घेतले नाही अशांना प्राधान्याने कर्ज मिळेल. संबंधितांची निकड लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून कर्ज वितरणाबाबत अंतिम निर्णय प्राचार्य घेतील.

**ब) सेवानिवृत्ती फंड :** जाने, 2021 पासून अंमलबजावणी 2/2/21

१. ठराविक वेतनावरील शिक्षक रु. १०००/- व शिक्षकेत्तर रु. ५००/- इतकी रक्कम जानेवारी २०२१ पासून दरमहा वेतनातुन कपात करुन पतसंस्थेकडे वर्ग केली जाईल. सदर रक्कम सेवानिवृत्तीवेळी अथवा नोकरी सोडून जातेवेळी संबंधितास पतसंस्थेच्या प्रचलित व्याजासह परत केली जाईल. संबंधितास या वर्गणीमध्ये वाढ करण्याची मुभा राहील.

**क) ग्रुप इन्श्यूरन्स :**

ठराविक वेतनावरील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा ग्रुप इन्श्युरन्स काढण्यात येईल. प्रिमीयम संबंधिताने भरायचा आहे. यापूर्वीच असा इन्श्युरन्स काढलेल्या कर्मचाऱ्यांना यातून वगळण्यात येईल.

**ड) वेतन खाते सुविधा :**

याबाबत कॅनरा बँकेस पत्र लिहीले जाईल. त्यांनी सुविधा देण्यास नकार दिला तर संस्थेच्या मान्यतेने वेतन खाते इतर बँकेत स्थानांतरीत करण्याबाबत विचार केला जाईल.

प्राचार्य

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय

लातूर